# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्र. बैठक-१८२४/प्र.क्र. ४३४/प्रनिप्रा/१२मार्च२०२६/परिपत्रक/ ५६५ दिनांक : 02 APR 2026

## परिपत्रक

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकियेमध्ये काही विद्यार्थी किंवा महाविद्यालयांकडून चुकीची माहिती / कागदपत्रे सादर केली जातात, बहुतांश वेळा विद्यार्थ्यांकडून अन्य विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे सादर केल्यामुळे संचालकांकडून सदरील प्रवेशास त्रुटी दर्शविण्यात येते, तद्नंतर विद्यार्थ्यांकडून सदरील प्रमाणपत्रे परस्पर प्राधिकरणाकडे तपासणीसाठी सादर करण्यात येतात. यामुळे सदरील प्रमाणपत्रे संचालनालयांमार्फत तपासणी करणे शक्य होत नाही, ही बाब प्रवेश मान्यता प्रदान करतेवेळी प्राधिकरणाच्या निदर्शनास आली आहे.

या विद्यार्थ्यांकडून झालेल्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्याचा प्रवेश अमान्य होतो व या अमान्य प्रवेश प्रकरणी पुनर्विलोकन अर्ज सादर केल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाच्या यंत्रणेवर कामाचा अतिरिक्त भार पडतो. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान प्रवेश झाल्यापासून ६ महिन्यांचा कालावधी निघून जातो.

भविष्यात विद्यार्थ्यांकडून अशा प्रकारच्या चुका / निष्काळजीपणा होऊ नये, असे प्रकार घडू नयेत या करीता विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी, या दृष्टिकोनातून प्राधिकरणाच्या दिनांक १२ मार्च २०२६ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>प्राधिकरणाचा निर्णय,-</u>**

"कागदपत्रे असून सुद्धा प्रवेश प्रक्रियेदरम्यान सादर न केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेप्रकरणी प्राधिकरणाचा अतिरिक्त वेळ व मनुष्यबळाचा वापर होतो. सदरचे प्रवेश मान्यतेसाठी सादर करताना संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे पडताळणी करावी लागतात. भविष्यात अशा प्रकारच्या वारंवार होणाऱ्या चूका कमी व्हाव्यात, यासाठी अधिनियम २०१५ चा सुधारणा अधादेश, २०२६ मधील कलम १६ (२) (चार) मधील अधिकारांचा वापर करुन प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे असताना सुद्धा किंवा विहीत कालावधीत प्रमाणपत्रे सादर न केलेल्या विद्यार्थ्यांस रुपये १०,०००/- इतकी रक्कम शुल्क म्हणून आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला."

प्रवेशासाठी इच्छूक सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त निर्णयाची नोंद घ्यावी.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
सदस्य सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.

[कृ.मा.प.]

D:\Jayant\Circular_IncompleteDoc_PenaltyDecision.docx

प्रति,- अधिष्ठाता/प्राचार्य, सर्व व्यावसायियिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४. संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई.
५. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
६. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत,-

१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
२. मा. सदस्य सचिव प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३. सुचनाफलक, प्राधिकरण व सीईटी कक्षाचे कार्यालय.
४. प्राधिकरण व सीईटी कक्षाचे अधिकृत संकेतस्थळ.